**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.**
**कोकण परिमंडळ कार्यालय**
**ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी**

---

**ग्राहक तक्रार क्र. ११/२०१५** **दि. १२.०५.२०१५**

| | |
|---|---|
| श्री संजय जयराम कात्रे<br>घर नं. ६६८, अनुराधा<br>फणसोप सडा, कसोप<br>ता./जि. रत्नागिरी | तक्रारदार ग्राहक |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| कार्यकारी अभियंता, महावितरण<br>विभागीय कार्यालय रत्नागिरी | विरुध्द पक्षकार |
| फोरम उपस्थिती | १) श्री. वि. रा. कांबळे,<br>सचिव तथा कार्यकारी अभियंता<br>२) श्री. ज. पु. बिवलकर<br>सदस्य |
| ग्राहकाच्या वतीने | १) श्री .संजय जयराम कात्रे<br>(स्वतः तक्रारदार) |
| विरुध्द पक्षकाराच्या वतीने | १) श्री. अनिल वा. महाजन<br>कार्यकारी अभियंता, रत्नागिरी<br>२) श्री. अजित अस्वले<br>अतिरिक्त कार्यकारी अभियंता,रत्नागिरी |

## महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग, ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल (ओम्बुडस्मन) विनियम २००६ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :

श्री संजय जयराम कात्रे, फणसोप सडा, कसोप, रत्नागिरी यांनी त्यांचे मालकीच्या घर नं. ६६८ 'अनुराधा' घरातील दि. ०५.०२.२०१५ रोजी सायंकाळी पाचच्या दरम्यान महावितरणचे ३३ kv लाईन काम सुरु असताना लाईन चाचणीचे वेळी मोठी ठिणगी टेलीफोनच्या वायरवर पडून घरातील टेलिफोन कनेक्शन, इंटरनेट कनेक्शन, बोर्ड, टेलिफोन सॉकेट व संगणक प्रणाली पूर्ण जळून गेली आहे. त्यामुळे मला रु. २४६००/- इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून मिळण्याबाबत तची तक्रार फार्म 'अ' मध्ये या मंचाकडे दि.१२.०५.२०१५ रोजी दाखल केलेली आहे. तक्रार दाखल होताच मंचाकडील पत्र क्र. ७० दि.१२.०५.२०१५ अन्वये कार्यकारी अभियंता रत्नागिरी यांचेकडे स्पष्टीकरण मागविणेत आले. तसेच विनियमामधील तरतुदीनुसार दि.१०.०६.२०१५ रोजी सुनावणी निश्चित करुन सुनावणीची प्रक्रिया त्याचदिवशी दि.१०.०६.२०१५ रोजी पूर्ण करण्यात आली.

तक्रारदाराचे तक्रारीचे स्वरुप असे आहे की त्यांचे फणसोप सडा, कसोप येथे घर नं.६६८ 'अनुराधा' नामक स्वतःचे मालकीचे घर आहे दि. ०५.०२.२०१५ रोजी सायंकाळी त्यांचे घरासमोर मोठा आवाज झाला आणि त्याचवेळी घरातील टेलिफोन कनेक्शनने पेट घेतला, इंटरनेट कनेक्शन,बोर्ड,टेलिफोन सॉकेट पूर्ण जळाली. व संगणक प्रणाली ही नादुरुस्त झाली. त्यावेळी त्यांचे घराजवळच रस्त्यावर महावितरण कंपनीचे श्री धुमाळ ३३ kv लाईनवर काम करीत होते. त्यावेळी मोठी ठिणगी टेलिफोन लाईनच्या जॉईंटवर पडली व तीला आग लागली आणि त्याचक्षणी त्याचे घरात वरील प्रकार घडला. व त्यांची संपूर्ण संगणक प्रणाली जळून रु. २४६००/- इतके नुकसान झालेले होते. त्या बाबींची श्री कात्रे यांनी दि.०६.०२.२०१५ रोजी महावितरणच्या पावस, रत्नागिरी येथील कार्यालयास लेखी तक्रार दिली आहे तसेच विद्युत निरीक्षक व मा.जिल्हाधिकारी यांनाही कळविलेले आहे असे दि. १०.०६.२०१५ सुनावणी दरम्यान सांगितले महावितरण कार्यालयास व विद्युत निरीक्षक यांना दिलेल्या त्यांचे पत्राची प्रत दाखल केली आहे. इलेक्टीकल इनस्पेक्टर कार्यालयाकडून ४/५ दिवसानी प्रत्यक्ष घटना स्थळी पहाणी करण्यात आली आहे व महावितरणला निष्कर्ष अहवाल दिला जाईल असे त्यांचेकडून सांगितल्याचे तक्रारदाराने सुनावणी दरम्यान सांगितले पण महावितरण कंपनीकडून कोणतीही प्रकारची पहाणी झाली नाही व नुकसान भरपाई न मिळालेमुळे त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, रत्नागिरी यांचेकडे दि.२०.०२.२०१५ रोजी रितसर तक्रार दाखल केली आहे त्यानुसार कक्षाने दि.१३.०४.२०१५ रोजी या प्रकरणाचा निर्णय दिला आहे. त्यामधे त्यांनी तक्रार निकाली काढणेत येत आहे व इतर अनुषंगिक अतिरिक्त बाबी नाकारण्यात येत आहेत असा आदेश काढला आहे. सदर आदेशामुळे त्यांचे समाधान न झालेमुळे त्यांनी या मंचाकडे तक्रार दि.१२.०५.२०१५ रोजी दाखल केली आहे.

महावितरणकडून पत्र क्र.३२७१ दि. ०६.०६.२०१५ अन्वये दाखल करण्यात आलेल्या स्पष्टीकरणामध्ये महावितरणकडून नमुद करण्यात आले आहे की सदर प्रकरणी श्री कात्रे यांनी विद्युत निरीक्षक कार्यालयाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्याअनुषंगाने विद्युत निरीक्षक कार्यालय

पुढील चौकशी करत आहेत. विद्युत निरीक्षक यांचा अहवाल प्राप्त होताच अपघाताचे व नुकसानाचे कारण स्पष्ट होईल.

तथापी कात्रे यांच्या म्हणण्यानुसार स्पार्किंग होऊन ठिणगी पडली आहे. तर टेलिफोन वायरमधून कोणताही विद्युत करंट वाहू शकत नाही या शिवाय महाराष्ट्र वीज नियामक आयोग विनियम २००६ विनियम ६.८ (३) अन्वये हे प्रकरण अपघात या सदरात येत असून सदर प्रकरण मंचाच्या अधिकार क्षेत्रात येत नाही त्यामुळे सदर प्रकरण निकालात काढणेत यावे अशी विनंती करणेत आलेली आहे या संबंधीचा तसा आदेश यापूर्वी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष यांनी पत्र क्र. २०४५ दि. १३०४.२०१५ अन्वये श्री संजय जयराम कात्रे यांना दिला आहे.

दि. १०.०६.२०१५ रोजी घेणेत आलेले सुनावणीमध्ये ग्राहकाचे वतीने श्री संजय जयराम कात्रे स्वत: व महावितरणकडून श्री अनिल वा. महाजन कार्यकारी अभियंता रत्नागिरी व श्री अजित अस्वले ( अतिरिक्त कार्यकारी अभियंता) यांनी भाग घेतला.

तक्रारदाराचे वतीने बाजू मांडताना श्री संजय जयराम कात्रे यांनी नमुद केले की माझे मु.पो. कसोप येथील निवासस्थानी दि.०५.०२.२०१५ रोजी सायंकाळी घरातील संगणक, मॉडेम स्फोट होऊन जळले त्यावेळी मुख्य रस्त्यावर महावितरणचे ३३ kv विद्युत वाहिनीचे काम सुरु होते तेथे ठिणगी पडून ती दूरध्वनीच्या वायरवर पडल्याने हा प्रकार घडल्याचे ठेकेदार श्री विचारे व महावितरणचे कर्मचारी श्री धुमाळ यांनी सांगितले. ग्राहकाचे घरी ब्रॉड बँड कनेक्शनही आहे म्हणून त्यांनी दि.०६.०२.२०१५ रोजी महावितरणच्या पावस,रत्नागिरी येथील कार्यालयाना सुचना दिली तसेच विद्युत निरीक्षक यांनाही कळविले. त्यांच्या कार्यालयाकडून ४/५ दिवसांनी प्रत्यक्ष घटनास्थळी पहाणी करण्यात आली. मात्र निष्कर्ष अहवाल महावितरणला दिला जाईल असे सांगण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयासही कळविले आहे. त्याचप्रमाणे दूरध्वनी कार्यालयासही तक्रार नोंद केली होती.

सदर दूर्घटनेमध्ये घरातील संगणक व मॉडेम जळल्याने माझे नुकसान झाले व दूरुस्तीचा खर्च रु. २४६००/- इतका येईल सोबत रत्नागिरी येथील अे वन सर्वीसेस या खाजगी संस्थेकडून इनस्पेक्शन करुन खर्चाबाबतचा, व Inspection report जोडलेला आहे, त्याची भरपाई मिळावी सदर संगणक सन २००९-१० मध्ये रु.२९०००/- ला खरेदी केला असही सांगितले. त्याचप्रमाणे सदर प्रकरणी पोलीस पंचनामा व महसूल खात्याकडून पंचनामा करुन घेतल्याचे विचारले असता 'नाही' असे त्यांनी उत्तर दिले. तसेच टेलिफोन खात्याकडील घडलेल्या घटनेबाबतचा अहवाल न घेतल्याचेही सांगितले. त्याबाबत कागदपत्रे व संगणक खरेदी बाबतच्या पावत्या सदर सुनावणीमध्ये ग्राहकाचे कडून सादर केल्या गेल्या नाहीत.

महावितरणकडून आपली बाजू मांडताना श्री महाजन यांनी नमुद केले की कृतीमानकांविषयीच्या २०१४ च्या विनियमातील व्याख्येनुसार तक्रारदार अर्जदार नाहीत. त्यामुळे त्यांना तक्रारीचा अधिकार नाही सदर तक्रारी बाबत टेलिफोन खात्याकडून कोणताही लेखी खुलासा सादर केलेला नाही. तसेच महसूल खात्याकडील पंचनामा झालेला नाही. ग्राहकाने स्वतःच नमूद केलेले आहे की विद्युत पुरवठयामुळे संगणक जळालेला नाही. त्यामुळे महावित्तरणची जबाबदारी

नाही. व नुकसान भरपाई देय नाही. या प्रकरणी मंच व विद्युत लोकपाल यांच्या संबंधीच्या विनियम २००६ कलम ६.८ (३) प्रमाणे तक्रार क्र. २७/२०१४ मध्ये अपघाताची बाब मंचाच्या अधिकार क्षेत्रा बाहेरील आहे, असा निर्णय रत्नागिरीच्या मंचाने दिला आहे. आमचेही तेच प्रतिपादन आहे. यास्तव सदर तक्रार निकाली काढावी अशी विनंती केली. पुढे श्री महाजन, कार्यकारी अभियंता असे ही म्हणाले की विद्युत पुरवठयामध्ये त्या घटनेच्यावेळी दोष नव्हता. जर का दोष असता तर घरातील अन्य उपकरणेही जळाली / बाधित झाली असती. त्यामुळे सदर जळीताचा प्रकार कोणतेही विद्युत कारणामुळे झालेला नसल्याने नुकसान भरपाईबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. मा. विद्युत निरीक्षक रत्नागिरी यांचे कार्यालयाकडून निरीक्षण अहवाल प्राप्त झालेनंतरच सदर अहवालाबाबतचे व नुकसानाबाबतचे कारण स्पष्ट होईल.

सदर प्रकरणामध्ये उभयपक्षाकडून सादर करणेत आलेली कागदपत्रे व सुनावणी दरम्यान करण्यात आलेला युक्तीवाद याचा अभ्यास करता मंचाकडून निष्कर्ष नोंदविण्यात येत आहे की सदर तक्रारीमधील तक्रारदार श्री कात्रे यांची संगणकप्रणाली ही जर का वीज संचाच्या स्पार्कींग/ ठिणगीमुळे/ अपघातामुळे जळाली असेल तर त्याबाबत तांत्रिकदृष्टया निरीक्षण नोंद करुन निरीक्षण अहवाल देण्याचा अधिकार हा Electrical Inspector or such other person as afore said and to such authorities as the appropriate Government may by general or special order direct, As per Indian Electricity Act २००३ section १६१.१. त्यामुळे सदर केसमध्ये तक्रारदाराने मा.विद्युत निरीक्षक यांना अपघात बाबत /जळीताबाबत तक्रार दिलेली आहे. महावितरण कंपनीनेही विद्युत निरीक्षक कार्यालयाकडून त्यांचा निरीक्षण अहवाल तातडीने प्राप्त करुन घ्यावा. श्री महाजन यांनी कृती मानकांच्या उल्लंघनाबद्दल देय होणाऱ्या भरपाई संबंधातील तरतुदीची गल्लत केली आहे. प्रस्तुत प्रकरणी कृती मानंकाच्या उल्लंघनाबद्दल तक्रार नाही तर विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १६१ प्रमाणे अपघातामुळे झालेल्या नुकसान भरपाईबाबत आहे त्यामुळे श्री महाजन यांचे म्हणणे गैरलागू आहे.

भारतीय विद्युत कायदा २००३ कलम १६१ अंतर्गत महाराष्ट्र शासनाने दि.१७.०४.२०१३ रोजी केलेल्या नियमानुसार ही घटना 'अपघात' या सदरात येत असल्याने महाराष्ट्र वीज नियामक आयोग विनियम २००६ कलम ६.८ (३) नुसार प्रस्तुत तक्रार मंचाच्या कार्यक्षेत्रात येत नाही. तसेच विनियम ६.९ नुसार सदर जळीत अपघातासाठी उभय पक्षाकडून जळीत विद्युत कारणाने झाले यासाठी "पुरेसे कारण नसलेने" मंचास सदर गाऱ्हाणे कोणत्याही टप्प्यात नाकारता येते. त्यामुळे सदर प्रकरण वरील कारणाने निकाली काढणेत येत आहे.

तथापी महावितरणनेही या प्रकरणामध्ये विद्युत निरीक्षक रत्नागिरी यांचेकडे पत्रव्यवहार करुन त्यांच्या अहवालानुसार व कंपनीच्या नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करणे योग्य होईल व त्याचप्रमाणे तक्रारदारांनेही विद्युत निरीक्षक यांच्या अहवालानुसार महावितरण कंपनी जळीतास

जबाबदार असेल तरच त्यांचेकडे भरपाईची मागणी करणे योग्य होईल. व भरपाईविषयी महावितरणच्या कार्यवाहीने समाधान न झाल्यास तक्रारदाराने नव्याने मंचाकडे तक्रार दाखल करणे उचित ठरेल.

## आदेश

**१) तक्रारदाराची तक्रार निकाली काढणेत येत आहे.**

**२) आदेशाविरुध्द अर्जदारास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.**

**पत्ता :- सचिव,**
**विद्युत लोकपाल**
**महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग,**
**६०६/६०८, केशवा,**
**बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५**
**फोन नं. ०२२- २६५९२९६५**

**श्री .वि.रा. कांबळे**
**सचिव / कार्यकारी अभियंता**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**श्री ज.पु.बिवलकर**
**सदस्य**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**दिनांक :- १९.०६.२०१५**
**ठिकाण :- रत्नागिरी.**